# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक

# अंतःशुद्धीचे सोपान

## *उद्धरण ७*

काही दिवसांपूर्वी एका व्यक्तीने मला सांगितले की, ती हठयोगातील ताडासन, ज्याला पर्वतासनही म्हणतात, ते करीत होती आणि शेवटी, तिला ध्यानाच्या गहनतेमध्ये उतरल्याचा अनुभव आला. तिने कित्येक वर्षे अनेकदा ध्यानप्रक्रियेचे असे वर्णन ऐकलेले होते. तरीही तिला नेहमी असे वाटे, की *तिने* ते करायचे आहे. तिने स्वतःला महत्प्रयासाने आणि चिकित्सक वृत्तीने या प्रयत्नात झोकून दिले होते. पण, त्या संध्याकाळी ताडासनात उभी असताना तिने काहीही प्रयत्न केला नाही. जसजसे तिचे शरीर पूर्ण संतुलनाच्या स्थितीमध्ये आले, तसतसे तिचे मन शांत झाले आणि ती ध्यानामध्ये उतरली. तिने इतकी गहन स्थिती अनुभवली, की त्याआधी तिने तशा स्थितीचा अनुभव कधीच घेतला नव्हता. ती स्थिती इतकी आनंदपूर्ण होती, इतक्या पवित्र आल्हादाने परिपूर्ण होती, की त्या स्थितीचे वर्णन करण्यासाठी तिला कोणतीही उपमा सुचलीच नाही. ती स्थिती अवर्णनीय होती.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग,* अध्याय ९ 'ज्ञानामध्ये दृढता,' यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. ५८-५९.